


## ‘पुष्पा’ फेम अभिनेता अल्लू अर्जुनला अटक व जामीन

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 14/१२/२०२४ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 03 ‖ RNI - MAHMAR51259 ‖ metrocity924@gmail.com

# राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आता रविवारी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : खातेवाटप, मंत्र्यांची संख्या यावरून महायुतीमध्ये घोळ कायम राहिल्याने शनिवारी प्रस्तावित असलेला राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आता रविवारी नागपूरमध्ये होईल असे सांगितले जाते. मात्र त्याला अधिकृत दुजोरा देण्यातआलेला नाही. भाजप नेत्यांना अजूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मनधरणी करावी लागत असताना भाजपमध्येही काही नावांवर आक्षेप असल्याचे समजते. दरम्यान शिंदे यांनी शुक्रवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली.

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून दोन आठवडे तर मुख्यमंत्र्यांचा शपथविधी पार पडून आठवडा उलटला तरीही संपूर्ण सरकार आकारास आलेले नाही. सोमवारपासून नागपूरमध्ये सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधीनंतर पहिल्याच पत्रकार परिषदेत सूतोवाच केले होते. फडणवीस यांनी नवी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशी भाजपच्या मंत्र्यांचे नावे आणि मित्रपक्षांच्या खात्यांवर चर्चा केली होती. शनिवारी विस्तार होईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तसे संकेत दिले होते. पण शुक्रवारी रात्रीपर्यंत विस्ताराबाबत काहीच निर्णय झाला नव्हता. विस्तार रविवारी दुपारी नागपूरमध्ये होईल, असे संकेत सरकारी सूत्रांकडून देण्यात आले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 14/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नागरिकांनी लोकोपयोगी उपक्रमाचा लाभ घ्यावा

## - ॲड.मोरेश्वर शेडगे

### माजी नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने लोकोपयोगी योजनांच्या शिबिराचे आयोजन

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी व महाराष्ट्राचे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे या दोन्ही जेष्ठ नेत्यांच्या 'जयंती' निमित्त भाजपा नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने सर्व चिंचवडकर नागरिकांसाठी '12 डिसेंबर ते 25 डिसेंबर या कालावधीत' लोकोपयोगी योजनांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सदर उपक्रम नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांचे जनसंपर्क कार्यालय, शेडगे बिल्डिंग, मनकर्णिका औषधालय शेजारी, पडवळ आळी, चिंचवडगाव. येथे राबविण्यात येत आहे.




या मध्ये 'आयुष्मान वय वंदना कार्ड हे सामाजिक-आर्थिक स्थिती न पाहता 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण प्रदान करते.हे कार्ड सुमारे 2000 वैद्यकीय प्रक्रियांचे उपचार देते आणि कोणत्याही प्रतीक्षा कालावधीशिवाय पहिल्या दिवसापासून सर्व विद्यमान आजारांना कव्हर करते.! या साठी लागणारी कागदपत्रे 1) आधारकार्ड2) आधारकार्डला लींक असलेला मोबाईल नंबर3) स्वतः व्यक्ती असणे आवश्यक.तसेच नविन मतदार नोंदणी करीता १) आधारकार्ड २) पॅनकार्ड ३) घरच्या पत्त्याचा पुरावा (पुढील पैकी एक) बँक पासबुक, लाईट बील, गॅस पावती कार्ड असणे आवश्यक याच बरोबर मोफत मतदान स्मार्ट कार्ड साठी 1) प्रभाग क्रमांक 18 चिंचवडगाव मतदार यादीत नाव असणे आवश्यक. सदर उपक्रम 'हे 12 डिसेंबर ते 25 डिसेंबर या कालावधीत दररोज सकाळी 9 am ते दुपारी 1.30 व दुपारी 4.30 ते रात्री 8.30 वाजेपर्यंत.

असतील जास्तीत जास्त नागरिकांनी सदर उपक्रमाचा लाभ घ्यावे असे आवाहन माजी नगर सेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांनी केले माहे

# रखडलेल्या मार्गाचे काम सुरू करण्याची

# खासदार बारणे यांची मागणी,गडकरी यांची सकारात्मकता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : तीर्थक्षेत्र देहूगाव ते देहूरोडपर्यंतचा साडेतीन किलोमीटर अंतराचा संरक्षण विभागाच्या हद्दीतील श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना पायी चालताना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी तत्काळ संरक्षण विभागाकडून जागा ताब्यात घेऊन रखडलेल्या मार्गाचे काम सुरू करण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत तारांकित प्रश्नाद्वारे केली. त्यावर याबाबत संरक्षण विभाग आणि राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागासोबत लवकरच एकत्रित



बैठक घेण्याची ग्वाही केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील पहिले साडेतीन किलोमीटर म्हणजे देहूगाव ते देहूरोड हे अंतर रुंदीकरण करणे फार महत्त्वाचे आहे. लष्कराच्या ताब्यात ही जमीन आहे, त्यामुळे येथे अडचणी आहेत. हा सुरुवातीचा टप्पा अतिशय कठीण आहे. तुकारामांची पालखी निघताना गाव लोटलेला असतो. यावेळेस या पालखी मार्गावरून बससेवा, वाहतूक आदी बंद ठेवावी लागते. त्याचा स्थानिक नागरिकांना खूप मोठा फटका बसतो. त्यामुळे देहूगाव ते देहूरोड हे अंतर रुंदीकरण करण्याची वारकऱ्यांची मागणी आहे.

याबाबत खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत तारांकित प्रश्नाद्वारे आवाज उठविला. ते म्हणाले, देहूगाव ते देहूरोड या साडेतीन किलोमीटर अंतराचा पालखी मार्ग संरक्षण विभागाच्या हद्दीतून जातो. या जागेचा ताबा राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. या जागेतील मार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. यामुळे वारकऱ्यांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. हा रस्ता पंढरपूर वारीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यावर होणारी वाहतूक आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय अत्यंत गरजेचा आहे. रस्त्याच्या देखभालीसाठी तसेच वारीच्या पवित्र सोहळ्याच्या सोईसाठी रखडलेला मार्गाचे रुंदीकरण करणे भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हा मार्ग कधीपर्यंत पूर्ण होईल. संरक्षण विभागासोबत जागेसंदर्भात काय कारवाई केली जाईल असा प्रश्न खासदार बारणे यांनी केला.त्यावर उत्तर देताना मंत्री नितीन गडकरी म्हणाले, रखडलेल्या पालखी मार्गाच्या रुंदीकरणाचे काम करण्यासाठी संरक्षण विभागाची परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याबाबत लवकरात लवकर संरक्षण विभागासोबत बैठक घेतली जाईल. राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाशीही चर्चा केली जाईल. त्यात मार्ग काढून काम पूर्ण केले जाईल

# सतीश वाघ खून प्रकरण

## चार आरोपींना २० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : हॉटेल व्यावसायिक सतीश सादबा वाघ यांचा सुपारी देवून खून केल्याप्रकरणात हडपसर पोलिसांनी अटक केलेल्या चार आरोपींना २० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश वानवडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने गुरुवारी दिले. भाडेकरूनेच पाच लाख रुपयांची सुपारी देवून खून केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.**

पवन श्यामसुंदर शर्मा (वय ३०, रा. फ्लॅट नंबर २०१ लक्ष्मी हाईट्स, काळुबाई नगर, आव्हाळवाडी), नवनाथ अर्जुन गुरसाळे (वय ३१, रा. अनुसया पार्क, गणेश नगर, डोमखेल रस्ता, वाघोली, मूळ रा. बीड), विकास ऊर्फ विक्की सीताराम शिंदे (वय २८, रा. बजरंग नगर, बाजार तळ्याशेजारी, आव्हाळवाडी रस्ता, वाघोली, मुळ रा. अहिल्यानगर) आणि अक्षय ऊर्फ सोन्या हरीश जावळकर (वय २९, रा. फ्लॅट नंबर ३०५ विघ्नहर्ता सोसायटी, शामचंद्र पार्क, फुरसुंगी फाटा) अशी आरोपींची नावे आहेत. तर पोलिस अतिश जाधव या आरोपीचा शोध घेत आहेत.

सतीश वाघ हे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा आहेत. या प्रकरणी वाघ यांचा मुलगा ओंकार वाघ यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी अक्षय जवळकर हा पूर्वी सतीश वाघ



यांच्याकडे भाडेकरू म्हणून राहत होता. त्यांच्यात वाद झाल्यामुळे अक्षयने खोली सोडली होती. या कारणावरून अक्षयने चार-पाच महिन्यांपूर्वी आरोपी पवनला वाघ यांचा खून करण्यासाठी पाच लाखांची सुपारी दिली होती. पवनने त्याचे साथीदार नवनाथ गुरसाळे, विकास शिंदे यांनी संगनमताने खुनाचा कट रचला.

सतीश वाघ ९ डिसेंबर रोजी सकाळी सहा वाजता फिरायला गेले असता आरोपींनी त्यांचे मोटारीतून अपहरण करून सासवडच्या दिशेने घेऊन निघून गेले. त्यानंतर चाकूने त्यांचा खून करून मृतदेह उरूळी कांचन परिसरात शिंदवणे घाटामध्ये फेकून दिला होता.

# शाळकरी मुलींचा पाठलाग

## अश्लील कृत्य,गुन्हा दाखल



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शाळकरी मुलींचा पाठलाग करुन त्यांच्याबरोबर अश्लील कृत्य करण्यात आल्याची घटना उघडकीस आली.

याप्रकरणी एकाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत एका मुलीच्या वडिलांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष आहे.तक्रारदारांची १३ मुलगी णि तिची मैत्रीण गुरुवारी सकाळी सव्वासातच्याा सुमारास शाळेत निघाल्या होत्या

त्यावेळी आरोपीने मुलींना अडवले आणि त्यांच्याशी अश्लील कृत्य करण्याचा प्रयत्न केला.मुलींनी आरडाओरडा केल्यनंतर आरोपी पसार झाला. घाबरलेल्या मुलींनी याबाबतची माहिती पालकांना दिली. त्यानंतर मुलीच्या वडिलांनी पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, उपनरीक्षक रतिकांत कोळी यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपीचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

शहरात गेल्या काही महिन्यांपासून अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 14/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे


e Paper

# पुष्पा फेम अभिनेता अल्लू अर्जुनला राहत्या घरातून अटक व जामीन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तेलुगु चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेता अल्लू अर्जुन याला पोलिसांनी अटक केली आहे. हैदराबादमध्ये ४ डिसेंबर रोजी 'पुष्पा' चित्रपटाच्या प्रीमियरवेळी घडलेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या घडामोडींमुळे चित्रपटसृष्टीला धक्का बसला असून आता अल्लू अर्जुनवर काय कारवाई होणार? याची चर्चा सुरू झाली आहे. ४ डिसेंबरला घडलेल्या या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेमध्ये एका ३९ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या महिलेचा मुलगा रुग्णालयात असून त्याची प्रकृती गंभीर आहे.**

चेंगराचेंगरी प्रकरणी पोलिसांनी अभिनेता अल्लू अर्जुन, संध्या थिएटर व्यवस्थापन आणि अल्लू अर्जुनच्या सुरक्षा पथकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्लू अर्जुन आणि त्याची टीम संबंधित थिएटरवर 'पुष्पा २' चित्रपटाच्या प्रीमियरसाठी येणार आहे, याबाबत पोलिसांना कोणतीही माहिती नव्हती, अशी माहिती इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तात नमूद करण्यात आली आहे.






**अल्लू अर्जुनला राहत्या घरातून केली अटक**

शुक्रवारी दुपारच्या सुमारास हैदराबाद पोलीस आयुक्तांची टास्क फोर्स आणि चिक्कडपल्ली पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी अल्लू अर्जुनच्या घरी पोहोचले. त्यांनी तिथून त्याला ताब्यात घेतलं. या अटकेपासून संरक्षण मिळावं, यासाठी अल्लू अर्जुननं तेलंगणा उच्च न्यायालयात अपीलही केलं होतं. पण अद्याप त्याला या प्रकरणात कोणताही दिलासा मिळालेला नाही. अल्लू अर्जुननं केलेली याचिका अद्याप सुनावणीसाठीच आलेली नाही. मात्र, त्याआधीच पोलिसांनी त्याला अटक केल्यामुळे यावरून आता मोठी चर्चा सुरू झाली आहे.

अल्लू अर्जुनला शुक्रवारी दुपारी अटक करण्यात आल्यानंतर चिक्कडपल्ली पोलीस स्थानकात नेण्यात आलं आहे. याच पोलीस स्थानकात चेंगराचेंगरीत महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. व उशिरा न्यायालयत जामीन मिळाले

# पोलिसांना धक्काबुक्की

## घराचा ताबा घेण्यासाठी आलेल्या वकील, फायनान्स कंपनीचे अधिकारी, पोलिसांना धक्काबुक्की

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : न्यायालयाच्या आदेशाने घराचा ताबा घेण्यासाठी आलेल्या वकील, फायनान्स कंपनीचे अधिकारी, पोलिसांना धक्काबुक्की केल्याची घटना दापोडी येथे घडली.

याप्रकरणी अनिल भुंडाराम चौधरी (२५), कमला अनिल चौधरी (वय २८), भुंडाराम जोधाराम चौधरी (वय ४९), पालीदेवी भुंडाराम चौधरी (वय ४०, चौघे रा. दापोडी), मकरंद शंकरदेव (वय ४८, रा. कात्रज) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल व्यंकटराव मनाळे (वय २९, रा. पुणे) यांनी दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चौधरी यांच्या घराचे हप्ते थकल्याने एका फायनान्स कंपनीने न्यायालयाकडून घराचा ताबा घेण्याचा आदेश घेतला. त्यानुसार कंपनीचे वकील मनाळे, अधिकारी, पोलीस हे कॅमेऱ्याच्या निगराणीत ताबा घेण्याची कारवाई करण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपींनी मनाळे आणि पोलिसांच्या अंगावर धावून येत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. मनाळे यांच्या सोबत बाचाबाची करून मारहाण केली. पोलिसांना धक्काबुक्की केली. दापोडी पोलीस तपास करीत आहेत.




बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968